# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धी पत्रक

- **मिरा भाईंदर महापालिकेच्या नाविन्यता कक्षाची यशस्वी वर्षपूर्ती**
- **महापालिकेच्या कामांची गुणवत्ता वाढली, उपक्रमांना झळाळी, कारभारही गतीमान**

दैनंदिन कामे करण्याबरोबरच विविध उपक्रम आणि मोहीम राबविण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेने स्थापन केलेल्या नाविन्यता कक्षाला एक वर्ष पूर्ण झाले आहे. या नाविन्यता कक्षामुळे महापालिकेच्या कामांच्या कक्षा रुंदावल्या असून नागरिकांच्या सोयीसाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात यश आले आहे. या कक्षामुळे महापालिकेचा कारभार गतीमान झाला आहे तसेच खर्चातही मोठी बचत झाली आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यात सर्वसमावेशक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे धोरण ठरवले असून त्यासाठी सातत्याने प्रोत्साहन दिले आहे. याच राज्य शासनाच्या धोरणानुसार मिरा भाईंदर महापालिकेने नाविन्यता कक्षाची स्थापना केली आहे. दैनंदिन उपक्रम, मोहीम आगळ्यावेगळ्या पद्धतीने करण्यात येत असल्याने या कक्षाचे नाव नाविन्यता कक्ष (इनोव्हेशन सेल) असे ठेवण्यात आले आहे. ठरावाद्वारे प्रशासकीय मान्यता घेऊन १ फेब्रुवारी २०२४ रोजी या नाविन्यता कक्षाची स्थापना करण्यात आली. महापालिकेच्या विविध उपक्रम आणि विभागांकरिता नेमलेल्या सल्लागारांना या एकाच कक्षाच्या अंतर्गत आणले असून, नाविन्यता कक्षामार्फत विविध संकल्पना विकसित करण्याबरोबरच केंद्र आणि राज्य शासनाच्या २० अभियानांचेही काम केले जात आहे. संकल्पना विकसन, संशोधन, मूल्यांकन पाहणी, सादरीकरण, कार्यशाळा आणि प्रशिक्षण घेणे, अहवाल तयार करण्यासाठी नाविन्यता कक्ष सतत प्रयत्नशील आहे. तसेच उपक्रमांची अंमलबजावणीही केली जात आहे. त्यामुळे महापालिकेच्या दैनंदिन कामकाजात सुसूत्रता आली असून. नवनवीन उपक्रम राबविणे आणि ते नागरिकांपर्यंत पोहोचवणे सुसह्य झाले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नाविन्यता शहर आणि स्टार्टअप या कार्यक्रमाशी सुसंगतपणे महापालिकेचा नाविन्यता कक्ष कार्य करत आहे. संशोधन आणि धोरण बनवणे यासाठी देखील नाविन्यता कक्ष महत्वपूर्ण भूमिका बाजवत आहे. नाविन्यात कक्षामार्फत विविध योजना आणि उपक्रम राबविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि पद्धतींचा वापर करण्यात येत आहे. परिणामी महापालिका हायटेक आणि स्मार्ट बनली आहे.

**नाविन्यता उपक्रमांचे यश**

नाविन्यता कक्षामार्फत एकूण २० हून अधिक अभियान राबवले जात आहेत. यात स्वच्छ भारत मिशन, कचरा मुक्त शहरे, माझी वसुंधरा अभियान, वॉटर प्लस, पेयजल सर्वेक्षण, जलशक्ती अभियान, पीएम गतिशक्ती, शहर सौंदर्याकरण स्पर्धा, मिशन लाईफ, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज आदी महत्त्वाचे अभियान असून, यांची अंमलबजावणी यशस्वीरित्या होत आहे. यास नागरिकांकडूनची चांगला प्रतिसाद मिळाला आहे. यासह, फराळ सखी, ई ऑफीस प्रणाली, ई हजेरी प्रणाली, कर्मचाऱ्याचे वेळेवर वेतन, ई निविदा, सखोल स्वच्छता मोहीम, उर्जा

बचत, डिजिटल कचरा व्यवस्थापन, मध्यान्ह भोजन, हरित कचऱ्यापासून उत्पन्न, पर्यावरणासाठी रविवार उद्यान आदी उपक्रम ही राबविले जात आहेत. तसेच होम@२०, फ्लड फ्री सिटी, स्किल सेंटर आदी उपक्रमांची मूल्यांकन पाहाणी केली नाविन्यता कक्षाद्वारे केली जात आहे. फराळ सखी उपक्रमाची नीती आयोगाने दखल घेत, नीती आयोगाच्या महिला उद्यम मंचाने या उपक्रमास पाठिंबा दिला आहे. याशिवाय शहरातील भविष्याच्या नियोजनासाठी तयार करण्यात आलेल्या कॉनक्लेव्ह मिरा भाईंदर@२०४७, सीएसआर कॉनक्लेव्ह आदींचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. सर्व अभियानांचा अहवाल व्यवस्थापन माहिती प्रणालीद्वारे कक्षामार्फत केला जातो. नाविन्यता कक्ष राबवित असलेल्या उपक्रमांना आत्तापर्यंत तब्बल १२.५ कोटींचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच नाविन्यता कक्षाने स्वतंत्र्यरित्या ४५ लाखांचा सामाजिक दायीत्त्व निधी मिळवून, त्याचा शालेय सुविधांकरिता वापर केला. तर, एम्पलॉएबलिटी@१८ या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांची अभियोग्यता चाचणी घेऊन, त्यांचे कल तपासून त्यानुसार प्रशिक्षण देऊन नोकरीची संधी देण्यात येते. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात ५ विद्यार्थ्यांना रेस्टॉरंटमध्ये नोकरी मिळाली आहे.

**महापालिकेच्या खर्चातही बचत-**

नाविन्यता कक्ष करत असेलल्या अतिरिक्त कामांमुळे महापालिकेच्या ७.१२ कोटींची बचत झाली आहे. राज्य शासनाच्या अद्यादेशानुसार अभियान राबविण्यासाठी, कामकाजात मदत म्हणून तसेच कामाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सल्लागार नेमण्याचा नियम आहे. महापालिकेत एकूण ८ सल्लागार विविध अभियान आणि विभागांमध्ये कार्यरत होते. या सल्लागारांची प्रत्येकी देय रक्कम २.५ लाख रुपये होती. एकूण त्यामुळे महापालिकेवर मोठ्या प्रमाणात आर्थिक भार पडत असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेने खुल्या निविदा प्रक्रियेद्वारे सर्व सल्लागारांना एका छताखाली आणले ज्याचे नाव नाविन्यता कक्ष असे ठेवण्यात आले. आज २२ सल्लागार काम करत असून त्यांची एकूण देय रक्कम १५ लाख आहे. यामुळे महापालिकेच्या खर्चातही मोठी बचत झाली आहे.

---

**शासकीय अभियांना मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त झालेले पुरस्कार (नाविन्यता कक्ष राबवित असलेले अभियान):**

| अभियान | वर्ष | प्राप्त पुरस्कार | रोख पारितोषिक |
|---|---|---|---|
| **माझी वसुंधरा अभियान 4.0** | 2023-2024 | प्रथम पारितोषिक (कोकण विभाग - अमृत सिटी) | ₹1.5 कोटी |
| **माझी वसुंधरा अभियान 3.0** | 2022-2023 | प्रथम पारितोषिक (लोकसंख्या गट 3 ते 10 लाख) | ₹9 कोटी |
| | | प्रथम पारितोषिक (भूमी थीमॅटिक क्षेत्र) | |
| **माझी वसुंधरा अभियान 2.0** | 2021-2022 | प्रथम पारितोषिक (भूमी थीमॅटिक क्षेत्र) | ₹2 कोटी |

| | | | |
|---|---|---|---|
| **सफाईमित्र सुरक्षा चॅलेंज** | 2021 | राष्ट्रीय स्तरावर 8 वा क्रमांक, राज्य स्तरावर 2रा क्रमांक | - |
| | 2022 | राष्ट्रीय स्तरावर 3रा क्रमांक, राज्य स्तरावर 1ला क्रमांक (लोकसंख्या गट 3 ते 10 लाख) | - |
| **पेयजल सर्वेक्षण** | 2023-2024 | राष्ट्रपती पुरस्कार | - |

**नाविन्यता कक्षाद्वारे करण्यात आलेले अतिरिक्त कामे आणि अंदाजित खर्च.**

| **अ.क्र. Sr No.** | **वर्गवारी (Category)** | **बाजारमुल्यांनुसार एकूण अंदाजित खर्च** | |
|---|---|---|---|
| 1 | **कार्यक्रम नियोजन आणि व्यवस्थापन** (Event Management) | 15 **लक्ष** (15 lakhs) | |
| | | 3 **लक्ष** (3 lakhs) | |
| | | 1 **लक्ष** (1 lakhs) | |
| | | 3 **लक्ष** (3 lakhs) | |
| | | 30 **लक्ष** (30 lakhs) | |
| | | 5 **लक्ष** (5 lakhs) | |
| | | 1 **लक्ष** (1 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष** (0.5 lakhs) | |
| 9 | **प्रशिक्षण / कार्यशाळा** (Training/ Workshop) | 5 **लक्ष** (5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष** (0.5 lakhs) | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 01 **लक्ष**<br>(01 lakhs) | |
| | | 1 **लक्ष**<br>(1 lakhs) | |
| | | 1 **लक्ष**<br>(1 lakhs) | |
| | | 5 **लक्ष**<br>(5 lakhs) | |
| 15 | **अभियान**<br>(Abhiyan Activity) | 5 **लक्ष**<br>(5 lakhs) | |
| | | 10 **लक्ष**<br>(10 lakhs) | |
| 17 | **विविध ऑप्टिट्युड परिक्षा**<br>(Online Aptitude Test Development) | 1 **लक्ष**<br>(1 lakhs) | |
| | | 1 **लक्ष**<br>(1 lakhs) | |
| | | 1 **लक्ष**<br>(1 lakhs) | |
| | | 1 **लक्ष**<br>(1 lakhs) | |
| 21 | **प्रकल्प अहवाल**<br>DPR/EOI | 20 **लक्ष**<br>(20 lakhs) | |
| | | 02 **लक्ष**<br>(2 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakh) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakh) | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| 29 | **धोरण तयार करणे**<br>Policy | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| 34 | Miscellaneous | 1 **लक्ष**<br>(1 lakh) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>(0.5 lakhs) | |
| 40 | **पत्रव्यवहार / सादरीकरण**<br>Documentation & Designing | 2 **लक्ष**<br>(2 lakhs) | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 5 **लक्ष**<br>(5 lakhs) | |
| 42 | **प्रकल्प प्रस्ताव / सी.एस.आर निधी**<br>Project Proposals & CSR Funding for MBMC | 1 **कोटी**<br>(1 crore) | |
| | | 2 **लक्ष**<br>(2 lakhs) | |
| | | 10 **लक्ष**<br>(10 lakhs) | |
| | | 10 **लक्ष**<br>(10 lakhs) | |
| | | 1 **लक्ष**<br>(1 lakhs) | |
| | | 0.5 **लक्ष**<br>( 0.5 lakhs) | |
| | | 1 **लक्ष**<br>(1 lakh) | |
| 51 | Auditing | 2 **लक्ष**<br>(2 lakhs) | |
| 54 | Organizations/ NGOs engaged for various projects under CSR (their est. total projects cost included in savings) | 2.75 **लक्ष**<br>(2.75lakhs) | |
| | | 2.24 **लक्ष**<br>(2.24 lakhs) | |
| | | 20.22 **लक्ष**<br>(20.22 lakhs) | |
| | | 1.10 **कोटी**<br>(1.10 Cr) | |
| | | 11.93 **लक्ष**<br>(11.93 lakhs) | |
| | | 8.37 **लक्ष**<br>(8.37 lakhs) | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 8 **लक्ष**<br>(8 lakhs) | |
| | | 7.65 **लक्ष**<br>(7.65 lakhs) | |
| | | 7.35 **लक्ष**<br>(7.35 lakhs) | |
| | | 73 **लक्ष**<br>(73 Lakhs)<br>(3 **वर्षांसाठी)** | |
| | | 55 **लक्ष**<br>(55 Lakhs) | |
| | | 10 **लक्ष**<br>(10 Lakhs) | |
| | | 40 **लक्ष**<br>(40 Lakhs)<br>(1 **वर्षांसाठी)** | |
| | | | |
| | | 1 **लक्ष**<br>(1 Lakhs) | |
| | | 2 **लक्ष**<br>(2 Lakhs) | |
| | | 30 **लक्ष**<br>(30 Lakhs) | |
| | | 10 **लक्ष**<br>(10 Lakhs) | |
| | | 0.25 **लक्ष**<br>(0.25 Lakhs) | |
| | | 55 **लक्ष**<br>(55 Lakhs) | |
| | **एकूण** | **7.12 कोटी** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **(अक्षरी- सात कोटी बारा लक्ष मात्र)** | |

सदरील कामाचे स्वरुप व नाविन्यता कक्षाद्वारे केलेल्या अतिरिक्त कामांमुळे रु.**7.12** कोटी (सात कोटी बारा लक्ष मात्र**)** इतकी बचत महानगरपालिकेस झालेली आहे.